दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • सोमवार दि.३० मार्च २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २११ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Monday 30 March 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 211 • Pages 4 • Rate 4 Rs


## इराण-इस्त्रायल युद्धाचा राज्याच्या शेतीला फटका

**मुंबई**-इराण आणि इस्त्रायल-अमेरिका यांच्यात वाढत चाललेल्या संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट असतानाच, याचे थेट परिणाम आता महाराष्ट्रातील शेती क्षेत्रावरही दिसू लागले आहेत. या युद्धामुळे आखाती देशांतील शेतीमालाच्या आयात-निर्यातीवर १०० टक्के परिणाम होणार असून, देशातील माल निर्यात न झाल्याने बाजारभावात मोठी घसरण पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी चिंता व्यक्त केली असून, भविष्यात युरिया खताच्या साठ्याबाबतही काळजी घ्यावी लागणार असल्याचे स्पष्ट केले आहे.आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार विस्कळीत झाला आहे. भारताचा शेतीमाल या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात होतो, मात्र देशातील शेतीमाल बाहेर जात नसल्याने बाजारभावावर त्याचा मोठा परिणाम दिसून येत आहे. स्थानिक बाजारपेठांमध्ये शेतीमालाचे भाव कोसळले आहेत. याचा फटका थेट शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला बसत आहे.

# दहाचे शंभर करणाऱ्यांची जागा तुरुंगातच

# कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांचा इशारा

## चुकीच्या कामाला आपले कधीच समर्थन मिळणार नसल्याची स्पष्टोक्ती



दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

दहाचे शंभर करणाऱ्यांची जागा तुरुंगातच आहे. चुकीची कामे घेऊन माझ्याकडे केव्हाच यायचे नाही. कारण, चुकीच्या कामाला माझे कधीच समर्थन मिळणार नाही, असे कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले आहे.पंकजा मुंडे यांच्या हस्ते अंबाजोगाई येथील भाजपच्या नव्या कार्यालयाच्या उद्घाटन केले. यावेळी बोलताना त्यांनी उपरोक्त विधान केले. त्या म्हणाल्या, माझ्याकडून कोणत्याही चुकीच्या गोष्टींची अपेक्षा करू नका. काळ बदलला आहे. स्वतःची परिस्थिती व ऐपत ओळखून त्यात आनंदी राहण्यास शिका. ज्याची ऐपत १० पैशांची आहे, त्याने कष्टाने त्याचे १५ पैसे करावेत. पण दहाचे शंभर करायला बघणाऱ्यांची जागा तुरुंगातच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या अनेक वर्षांत हे दाखवून दिले आहे. त्यामुळे माझ्याकडे एकही चुकीचे काम घेऊन येऊ नका.

अंबाजोगाई व परळी परिसरातील गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी भाजपने हे कार्यालय सुरू केले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनीही आर्थिक व्यवहारात पारदर्शकता ठेवली पाहिजे. मी तुम्हाला १० लाखांचे पत्र दिले. त्यात नियमानुसार १ लाख कमवा. पण काम दर्जेदार करा. घरांचे मजले कसे चढतात हे घरच्यांनी व बापाने विचारायला हवे. चुकीच्या मार्गाने कमावले तर कारवाई व अटक अटळ आहे हे लक्षात ठेवा, असे त्या म्हणाल्या.पंकजा मुंडे यांनी यावेळी राजकारणातील विश्वासघातकी प्रवृत्तीवर जोरदार प्रहार केला. त्या म्हणाल्या, काही लोक आपल्याला सोडून गेलेत. तर काही लोक आपला वापर करून दुसऱ्यांशी संधान साधण्याचा प्रयत्न करत गडबड करत आहेत. पण जो माझ्यासोबत कारस्थान करतो तो कुठे असतो? माझ्या हृदयात पाप नाही. त्यामुळे माझ्या पाठीशी देवाचा आशीर्वाद आहे. राजकारणात जय - पराजय होतच असतो. माझाही पराभव झाला. पण ज्यांनी हे कारस्थान केले ते आज नकाशावरून गायब झालेत.

मला काहीच करावे लागले नाही. निसर्गच योग्य वेळी काय करायचे ते ठरवतो. चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीशी सर्व शक्ती उभी राहते. त्यामुळेच तुम्हीच माझी खरी ताकद आहात. एखादा कार्यकर्ता आजारी असेल, त्याला कॅन्सरसारखा गंभीर आजार असेल, तर मी माझे घर गहाण ठेवून त्याला मदत करेन. पण कुणी चुकीची कामे करून किंवा फसवणूक करून संकटात सापडला असेल, तर मी त्याला कोणतीही मदत करणार नाही, असेही मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

## प्रा.विक्रम सोनाजी इनकर यांना राज्यशास्त्र विषयात पीएचडी प्रदान

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

नेकनूर येथील प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.विक्रम सोनाजी ईनकर यांना राज्यशास्त्र विषयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.श्री.इनकर यांनी राज्यशास्त्र विषयातमहाराष्ट्रातील जातीय हिंसाचार एक -चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले.संशोधन मार्गदर्शक डॉ.सुनील पिंपळे यांच्या मार्गदर्शना खाली संशोधन कार्य पूर्ण केले.या यशाबद्दल संस्थापक सचिव खा. रजनीताई अशोकराव पाटील,सचिव आदित्य



पाटील,प्राचार्य डॉ.ढास सर यांच्यासह शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे.

## तळोदा शहरात रामजन्मोत्सव सोहळा उत्साहात श्रीराम मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल प्रखंड, तळोदा यांच्या वतीने शहराचे आध्यात्मिक केंद्र असलेल्या श्रीराम मंदिर येथे रामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात. आला. २६ मार्च रोजी पार पडलेल्या या सोहळ्यासाठी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेत मंदिर परिसराची स्वच्छता, रंगरंगोटी आणि आकर्षक रोषणाई केली होती, ज्यामुळे संपूर्ण परिसरात प्रसन्नता पसरली होती.

या उत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे शहरातील महिला वर्गाने एकत्र येत केलेले सामुदायिक रामरक्षा पठण आणि रामधून. या भक्तीमय उपक्रमाने अवघा परिसर चैतन्याने भारून गेला होता. दुपारी ठीक १२ वाजता फटाक्यांच्या जल्लोषात प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या मंगलमयी प्रसंगी शहराचे प्रथम नागरिक भाग्यश्री चौधरी,योगेश चौधरी, तसेच आरतीचे मानकरी सुरेश चौधरी आणि शहराचे जहागीरदार ऋषिकेश बारगड यांनी प्रभू श्रीरामाची विधीवत आरती केली. दिवसभर चाललेल्या या विविध धार्मिक




कार्यक्रमांनी भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. सायंकाळी प्रभू श्रीरामाची सांज आरती आणि त्यानंतर काढण्यात आलेल्या भव्य रॅलीने या उत्सवाची सांगता झाली.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रखंड मंत्री दीपक चौधरी, प्रखंड सहमंत्री पवन शेलकर, प्रखंड अध्यक्ष आर.डी.मोरे, प्रखंड कोषाध्यक्ष स्वप्निल वाणी, जिल्हा सहयोजक अजय ठाकरे, मठ मंदिर प्रमुख छोटूलाल प्रजापती, सत्संग प्रमुख भूपेंद्र बारी, सेवाप्रमुख महेंद्र गुरव, विशेष संपर्कप्रमुख हेमंत पाटील, गोरक्ष प्रमुख पंकज मराठे, सह मठ मंदिर प्रमुख पवन माळी, युवा कार्यकर्ता यशराज बारगळ, सल्लागार समिती प्रमुख ऋषिकेश बारगळ आणि नारायण भाई पटेल यांनी विशेष परिश्रम घेतले. तळोदा परिसरात या शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे विशेष कौतुक होत आहे.

## नंदुरबार तालुक्याचा पाणीप्रश्न सुटणार; आमदार डॉ.विजय कुमार गावित यांच्या प्रयत्नातून २३ गावांना टँकरचे वाटप

### माजी खासदार डॉ.हिना गावित यांच्या हस्ते लोकार्पण; टंचाई निवारणासाठी युद्धपातळीवर उपाययोजना

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार विधानसभा क्षेत्रातील ग्रामीण भागात उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे उद्भवणाऱ्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी माजी मंत्री आमदार डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या विशेष प्रयत्नातून मोठा दिलासा मिळाला आहे. तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींना हक्काचे पाणी टँकर उपलब्ध करून देण्यात आले असून, त्यापैकी पहिल्या टप्प्यातील १० टँकरचे वितरण २८ मार्च २०२६ रोजी संसद रत्न माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले. या विशेष प्रसंगी आमदार डॉक्टर विजयकुमार गावित यांनी व्हिडिओ कॉलद्वारे उपस्थित राहून टँकरची पाहणी केली. त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांना शुभेच्छा दिल्या आणि मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाला पाणी मिळेल, अशी ग्वाही




दिली.कार्यक्रमाला संबोधित करताना डॉक्टर हिना गावित म्हणाल्या की, ग्रामीण भागातील जनतेला पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी शासन आणि प्रशासन स्तरावर आमचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. २३ ग्रामपंचायतींना टँकर उपलब्ध झाल्यामुळे टंचाईच्या काळात टँकरसाठी लागणारी प्रतीक्षा आता संपणार आहे.नंदुरबार विधानसभा क्षेत्रातील बलवंड, होळ तर्फे रनाळे, वैंदाने, आसाने, मांजरे, रजाळे, खोंडामळी, कोळदा, शनिमांडळ या गावांना या प्रसंगी टँकरचे प्रत्यक्ष वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाला भाजप तालुकाध्यक्ष दीपक पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण पाटील, सागर तांबोळी, वैंदाने उपसरपंच मनोज गिरासे, होळ सरपंच व्यंकट पाटील, आसाने सरपंच शरद पाटील, न्याहली उपसरपंच ए बी पाटील, घोटाने सरपंच सचिन धनगर, बलवंड सरपंच संजय पाटील, मांजरे उपसरपंच दगा कोळी, कंढरे सरपंच लोटन पाटील यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोणगांव येथील बारस यात्रेला आजपासून सुरुवात

दैनिक वादळ वार्ता

**बिलोली । हानुमंत चंदनकर**

नांदेडच्या बिलोली तालुक्यातील डोणगांव( बु ) येथील बारस यात्रेला आजपासून सुरुवात झाली गावातील मानाची काठी नवे वस्त्र परिधान करून महदेव मंदिरावर नेन्यात आली दिनांक ३० मार्च रोजी सकाळी आबली कार्यक्रम व शिवपार्वती विवाह सोहळा व रात्री रात्रभर मनोरंजनाची विविध कार्यक्रम ३१ मार्च रोजी भव्य कुस्ती दंगल१ एप्रिल काठ्या कावडी पेडे बत्तासे वाटप महादेव मंदिर ते मंठ संस्थान डोमगांव वाटप कार्यक्रमांची सांगता होणार आहे तरी परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## केज येथे न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभ उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय परिसरात नवीन न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभ रविवार,दि.२९ मार्च २०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या कार्यक्रमाला न्याय क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती श्री. किशोर चंद्रकांत संत व माननीय न्यायमूर्ती श्री. अभय ज.मंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माननीय श्री.सिद्धेश्वर सुंदरराव ठोंबरे यांची विशेष उपस्थिती लाभली.केज तालुक्याचे भूमिपुत्र असल्यामुळे त्यांचे विशेष स्वागत करण्यात आले.या

कार्यक्रमास राजस्थान उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती तथा महाराष्ट्र राज्य स्थावर मालमत्ता नियामक मंडळ अध्यक्ष माननीय श्री.संभाजीराव शिवाजीराव शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश माननीय श्री.आनंद लक्ष्मीचंद यावलकर यांनी भूषविले.या प्रसंगी जिल्हा न्यायाधीश-१तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश माननीय श्री.सुधीर बाबूराव भाजीपाले आणि केज वकील संघाचे अध्यक्ष ॲड. महादेव संपतराव लाड यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे औक्षण करून त्यांना फेटे बांधण्यात आले. ऊसतोड कामगार संचलित श्री साने गुरुजी निवासी विद्यालय,केज यांच्या




विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. त्यानंतर मान्यवरांचा शाल,श्रीफळ,रोपटे व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी ॲड.महादेव लाड यांनी मनोगत व्यक्त करत बांधकामाचा आढावा घेतला.अध्यक्षीय भाषणात न्यायाधीश श्री. आनंद यावलकर यांनी न्यायालयीन सुविधांच्या वाढीमुळे पक्षकार व वकिलांची मोठी सोय होणार असल्याचे सांगितले.प्रमुख पाहुणे श्री.संभाजीराव शिंदे यांनी न्यायव्यवस्थेत मध्यस्थी (मेडिएशन) पद्धतीचा अधिक वापर करण्याची गरज व्यक्त केली.तसेच 'राईट टू एज्युकेशन' व आरोग्य या विषयांवरही त्यांनी विशेष भर दिला.न्यायमूर्ती श्री.सिद्धेश्वर ठोंबरे यांनी आपल्या कारकिर्दीचा प्रवास मांडत केज तालुक्याशी असलेले भावनिक नाते व्यक्त केले.न्यायमूर्ती श्री. अभय मंत्री यांनीही आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन न्यायाधीश श्री. सुधीर भाजीपाले यांनी केले.समारंभानंतर उपस्थितांनी स्नेह भोजनाचा आस्वाद घेत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.नवीन मजल्याच्या उभारणीमुळे केज परिसरातील न्यायालयीन कामकाज अधिक सुलभ होऊन नागरिकांना न्याय प्रक्रियेत मोठा दिलासा मिळणार असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

# संपादकीय

## वेशीवरच्या युद्धकळा

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाबाबत भारताची नेमकी भूमिका काय, या प्रश्नाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अखेर संसदेतील भाषणाद्वारे उत्तर दिले आहे; त्याचबरोबर या युद्धामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य परिस्थितीचीही जाणीवही देशवासीयांना करून दिली आहे. युद्ध सुरू होऊन तीन आठवड्यांहून अधिक दिवस झाले असून, ती थांबण्याची चिन्हे नाहीत; उलट त्याची व्याप्ती वाढते आहे.परस्परांना धडा शिकविण्यासाठी दोन्ही बाजूंकडून युद्धाची तीव्रता अशीच वाढत राहिल्यास अभूतपूर्व स्थितीला सामोरे जावे लागणार आहे. या परिस्थितीला तोंड देण्याची तयारी ठेवा, हा पंतप्रधानांच्या भाषणाचा मथितार्थ. युद्ध सुरू झाल्यापासून भारताने कळीच्या विषयांवर मौन बाळगल्याची टीका विरोधी पक्षांकडून करण्यात येत होती. त्या पार्श्वभूमीवर मोदी यांनी संसदेच्या व्यासपीठावरून सद्यस्थितीवर भाष्य केले आहे.पंतप्रधानांच्या भाषणामध्ये गेले काही दिवस सुरू असलेल्या संघर्षाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली; तसेच पश्चिम आशियातील देशांच्या प्रमुखांशी केलेल्या चर्चेबाबत माहिती दिली. तणाव कमी करण्याचा आणि संघर्ष संपवण्याचा आग्रह भारताने पूर्वीपासूनच धरला आहे. संघर्षग्रस्त देशांमधील सुमारे एक कोटी भारतीय आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेवर त्यांनी भर दिलाच. त्यासोबत ऊर्जाकेंद्रे आणि व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांना त्यांनी विरोध केला, त्यामागे भारताची ऊर्जासुरक्षा हा मुद्दा सर्वांत कळीचा आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्याने भारतासह अन्य आशियाई देशांच्या इंधनपुरवठ्यात खंड पडला आहे. त्यामुळे विशेषत: इंधनवाहक जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी प्रयत्न, ही काळाची गरज आहे. होर्मुझमधून तेलवाहक जहाजांना सुरक्षितता पुरवण्यात अमेरिकादी देशांना यश आलेले नाही. त्यामुळेच सध्या तरी इराणशी चर्चेवर भर देणे शहाणपणाचे आहे.त्या पार्श्वभूमीवर तेलसाठ्यांवरील हल्ल्यांचा मुद्दा उपस्थित करून इराणसोबतच इस्रायल आणि अमेरिकेच्या कारवाईबाबतही मोदी यांनी केलेल्या नाराजीवजा टिप्पणीकडे पाहता येते. याआधी इराणवरील हल्ल्यांबाबत कथित मौन, इराणच्या सर्वोच्च नेत्यांना श्रद्धांजली वाहण्यात विलंब आणि त्यापूर्वीची इस्रायल भेट यांवरून भारताच्या भूमिकेवर टीका झाली होती; त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी संसदेच्या व्यासपीठावरून मांडलेली भूमिका अधिक संतुलनाकडे जाणारी दिसते. या भाषणापूर्वी एक दिवस त्यांनी इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्याशी केलेली चर्चाही याच अनुषंगाने महत्त्वाची ठरते.युद्धस्थितीच्या परिणामांचा आणि त्या आघाडीवरील सद्यस्थितीचाही मोदी यांनी आपल्या भाषणात आढावा घेतला. विशेषत: देशाच्या गरजेपैकी साठ टक्के द्रवरूप वायूच्या आयातीमध्ये युद्धामुळे मोठी घट झाली आहे. देशात कच्च्या तेलाचा ५३ लाख टन साठा असून, तो ६५ लाख टनांपर्यंत नेण्याचे प्रयत्न, तेलशुद्धीकरणाच्या क्षमतेतील वाढ, आयातीमधील विविधीकरण, पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण, शाश्वत उर्जास्रोतांच्या पर्यायांबाबत उपाययोजना आणि जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी राजनैतिक प्रयत्न यांबाबत सरकार उचलत असलेल्या पावलांची त्यांनी माहिती दिली. करोना संकटाची आठवण करून देत मोदी यांनी युद्ध लांबल्यास काय स्थिती होऊ शकते, याविषयी इशाराही दिला आहे. त्या काळात विस्कळित झालेली पुरवठा साखळी अजूनही पूर्वपदावर येऊ शकलेली नाही; याची जाणीव ठेवून साऱ्या यंत्रणेने युद्धपातळीवर काम करण्याची गरज आहे.भारताच्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असल्याची ग्वाही मोदी यांनी दिली असली, तरी सध्या गॅसअभावी विविध शहरांमध्ये बंद पडण्याच्या मार्गावर असलेला हॉटेल उद्योग आणि ठिकठिकाणी उद्योगांची थंडावलेली चक्रे सद्यस्थिती आणि भविष्यातील वास्तवाची जाणीव करून देत आहेत. या स्थितीचा फायदा घेण्याच्या प्रयत्नांवर भाष्य करून इंधन व गॅसच्या काळ्या बाजाराबाबत सतर्क राहण्याचा त्यांचा इशारा यंत्रणा किती गांभीर्याने घेतात, ते महत्त्वाचे आहे. गेल्या काही दिवसांमध्ये या संवेदनशील विषयावरून विरोधकांनी सरकारवर टीकास्त्र सोडणे आणि सरकारपक्षाकडून विरोधकांनाच जबाबदार धरण्याचे प्रकार घडले. त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी एकजुटीने या संकटाचा मुकाबला करण्याबाबत केलेले आवाहन सर्वांत महत्त्वाचे आहे. त्यासाठी विरोधकांनी वास्तव समजून घेणे आणि सरकारनेही त्यांना विश्वासात घेण्याची गरज आहे. अर्थात, अधिवेशन समाप्त झाल्यावर हे भान कोण बाळगते, हे विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात दिसेलच.

# एसुस ने मुंबईत बियॉन्ड इन्क्रेडिबल विथ एसुसच्या पहिल्या आवृत्तीसह २०२६ कम्युनिटी इव्हेंटची सुरुवात केली

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

: तैवानस्थित तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एसुस ने आपल्या २०२६ कम्युनिटी इव्हेंट मालिकेतील पहिल्या शहर आवृत्तीचे, बियॉन्ड इन्क्रेडिबल विथ एसुस, मुंबईत यशस्वीपणे सादर केली. दादर सोशल्स येथे आयोजित या कार्यक्रमात ९५ पेक्षा अधिक क्रिएटर्स, तंत्रज्ञानप्रेमी, विद्यार्थी, चाहत्यांसह प्रादेशिक माध्यम प्रतिनिधी सर्जनशीलता, नवकल्पना आणि पुढील पिढीतील संगणकीय अनुभवांवर आधारित एका सखोल संध्याकाळसाठी एकत्र आले. एसुस च्या २०२६ कम्युनिटी एंगेजमेंट कॅलेंडरची सुरुवात दर्शवणाऱ्या या मुंबई आवृत्तीत, ब्रँडचा क्रिएटर-केंद्रित तंत्रज्ञानावरील वाढता भर तसेच त्याच्या प्रीमियम कंझ्युमर लॅपटॉप पोर्टफोलिओवर विशेष प्रकाश टाकण्यात आला.या सत्रात एसुस च्या नवीनतम क्रिएटर सेरीज डिव्हाइसेसचे प्रमुख आकर्षण म्हणून प्रदर्शन करण्यात आले, तसेच झेनबुक एएमडी मालिकेचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले, ज्यामुळे कंपनीची क्रिएटर्स, व्यावसायिक आणि दैनंदिन वापरकर्त्यांना बहुपयोगी आणि उच्च कार्यक्षमतेवर आधारित संगणकीय उपायांसह सक्षम करण्याची बांधिलकी अधोरेखित झाली. एसुस ने उपस्थितांसाठी एक विशेष संवाद सत्र देखील आयोजित केले, ज्यामध्ये कंपनीच्या उत्पादन



धोरणाचा आणि भारतातील सुरू असलेल्या कम्युनिटी उपक्रमांचा आढावा देण्यात आला.कार्यक्रमाला संबोधित करताना एसुस इंडियाचे कन्झ्युमर आणि गेमिंग पीसी विभागाचे उपाध्यक्ष श्री. अर्नोल्ड सू म्हणाले, २०२६ मधील पहिला कम्युनिटी इव्हेंट ही अर्थपूर्ण सुरुवात असणे आवश्यक होते आणि शहरात असलेल्या क्रिएटर इकोसिस्टममुळे मुंबई योग्य पर्याय वाटला. आजचे ग्राहक त्यांच्या डिव्हाइसेसमधून काय अपेक्षित आहे याबाबत बरेच अधिक जागरूक आहेत - मग ते कार्यक्षमता, पोर्टेबिलिटी किंवा दीर्घकाळ वापरत असतानाची विश्वासार्हता असो. अशा संवादांमुळे आम्हाला एकाकीपणे काम करण्याऐवजी त्या अपेक्षांच्या अधिक जवळ राहता येते,. या कार्यक्रमामुळे आम्हाला आमची नवीनतम उत्पादने अधिक व्यावहार्य संदर्भात सादर करण्याची संधी मिळाली आणि ती क्रिएटरच्या कार्यप्रवाहात कोठे बसतात हेही दाखवता आले.या सत्रात प्रोआर्ट गोप्रो आवृत्ती, प्रोआर्ट पी१६ आणि आरओजी झेफायरस जी१४ यांचे इंटरएक्टिव्ह प्रॉडक्ट वॉकथ्रू सादर करण्यात आले. लाईव्ह डेमोन्स्ट्रेशनद्वारे क्रिएटरच्या प्रत्यक्ष कार्यप्रवाहांचे प्रदर्शन करण्यात आले, ज्यातून एसुस डिव्हाइसेस आधुनिक कंटेंट क्रिएशन आणि मल्टिटास्किंगच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कार्यक्षमता, अचूक डिझाइन आणि एआय-सक्षम क्षमतांचा कसा समन्वय साधतात हे अधोरेखित करण्यात आले.इंटरॲक्टिव्ह अनुभव अधिक समृद्ध करताना, लोकप्रिय क्रिएटर्स रविरंजन सिंग, राहूल हिंदूजा, रेबेक कौर, शौर्य, खुमेल ठाकूर आणि बुलबुल भान यांनी उपस्थितांशी थेट संवाद साधला, प्रत्यक्ष सर्जनशील अनुप्रयोगांचे प्रात्यक्षिक दिले आणि त्यांच्या व्यावसायिक कार्यप्रवाहांमधील अनुभव शेअर केले. त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमाच्या कम्युनिटी-केंद्रित दृष्टिकोनाला अधिक बळ मिळाले आणि सहभागींमध्ये प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्यास तसेच परस्पर शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले.या संध्याकाळी लाईव्ह डेमो, प्रत्यक्ष अनुभव, इंटरॲक्टिव्ह चर्चा आणि कम्युनिटी-नेतृत्वाखालील संभाषणे अशा आकर्षक उपक्रमांचा समावेश होता, ज्यामुळे उपस्थितांना एसुस च्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. कार्यक्रमात निवडक गिव्हअवेचाही समावेश करण्यात आला होता, ज्यामुळे सहभागींचा सहभाग अधिक वाढला आणि एसुस च्या सुलभ व इमर्सिव्ह तंत्रज्ञान अनुभव देण्याच्या वचनबद्धतेला अधिक बळ मिळाले.२०२५ मध्ये बेंगळुरू, पुणे, हैदराबाद आणि कोलकाता येथे आयोजित यशस्वी चार-शहर कम्युनिटी टूरनंतर 'बियॉन्ड इन्क्रेडिबल विथ एसुस' ब्रँडच्या वाढत्या युजर कम्युनिटीशी संवाद मजबूत करणे सुरू ठेवत आहे. मुंबई आवृत्ती ही या उपक्रमाच्या २०२६ च्या अध्यायाची सुरुवात दर्शवते, तर पुढील कार्यक्रम चेन्नई येथे आयोजित होणार आहे, कारण एसुस भारतभर अधिक सखोल तंत्रज्ञानविषयक संवाद आणि कम्युनिटी कनेक्शन्स वाढवण्याच्या आपल्या प्रयत्नांचा विस्तार करत आहे.

# ठाणे जिल्ह्यात बाटली किंवा कॅन मध्ये पेट्रोल-डिझेल विक्रीवर बंदी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

समाजमाध्यमांवर पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याच्या अफवा आणि बातम्या पसरत असल्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हा प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने पेट्रोलसारख्या ज्वलनशील पदार्थांच्या मुक्त विक्रीमुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी पेट्रोलियम नियम २००२ मधील तरतुदींनुसार जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवरून खुल्या स्वरूपात इंधन विक्री करण्यास तातडीने मनाई केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी निर्गमित केलेल्या या आदेशानुसार, आता जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांना पेट्रोल किंवा डिझेल



केवळ वाहनांच्या इंधन टाकीमध्येच वितरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांना प्लास्टिकच्या बाटल्या, कॅन, डबे किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या भांड्यांमध्ये सुटे पेट्रोल अथवा डिझेल विकता येणार नाही. या नियमाचे उल्लंघन करणे बेकायदेशीर असून, पंपावरील सुरक्षितता जपण्यासाठी सर्व पेट्रोल पंप परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा चोवीस तास कार्यरत ठेवणे आणि इंधन विक्रीच्या नोंदी नियमित ठेवणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित पेट्रोल पंप मालक आणि व्यवस्थापकांची असणार आहे. हा आदेश २७ मार्च २०२६ पासून तात्काळ प्रभावाने लागू झाला असून, पुढील सूचना मिळेपर्यंत तो प्रभावी राहील. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेवर पेट्रोलियम नियम २००२, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदींनुसार कठोर दंडात्मक व फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# गणेश जाधव यांची राष्ट्रीय अँटी करप्शन बोर्डा मार्फत राष्ट्रीय युवा अध्यक्षपदी फेर निवड


दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबईत. गेली १० वर्षापासून राज्यातील कुठल्याही जिल्ह्यामधील कुठल्याही समाजाचे रुग्ण नवी मुंबईत आल्यावर त्यांच्याशी संपर्क झाला असता त्यांची सेवा तत्परतेने करताना दिसत आहेत त्याचबरोबर कामगार वर्गांना न्याय दिला पीडित वर्गांना आधार दिला समाजसेवेची ध्यास घेणार हा अवलिया म्हणजे गणेश जालिंदर



जाधव असे या व्यक्तीचे नाव आहे गेली अनेक वर्षांपासून समाजसेवेचा ध्यास घेणारी गणेश जाधव गेली १० वर्षापासून रुग्णांसाठी अनेक कामगारांसाठी धडपडत आहेत या कामाची पोचपावती म्हणून राष्ट्रीय अँटी करप्शन बोर्ड मार्फत राष्ट्रीय युवा अध्यक्ष म्हणून त्यांची पुन्हा फेर निवड करण्यात आली आहे या निवडीबद्दल नवी मुंबई व परिसरात युवा तरुणांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे

**लोणवळ गावच्या पोलीस पाटील पदी बाबुराव अर्जुन थोरात यांची निवड झाल्या बद्दल संजीवनी मल्टीस्टेट बँकेचे चेअरमन सुरेशजी पासंगे साहेब , सचिन महाजन सत्कार करून शुभेच्छा देताना.**



# नवी मुंबईत न्यूईरा हॉस्पिटलचे 'लर्जी क्लिनिक' सुरू; १५० लर्जन्स तपासणीचा घेता येणार लाभ

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

वाढत्या लर्जीच्या समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून न्यूईरा हॉस्पिटलने नवी मुंबईत अत्याधुनिक सोयीसुविधांयुक्त 'लर्जी क्लिनिक' सुरू केले आहे. या क्लिनिकअंतर्गत रुग्णांसाठी एक विशेष 'लर्जी पॅकेज'तयार करण्यात आले असून,यातंर्गत एकाच पॅनेलमध्ये तब्बल १५० लर्जन्सची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यामुळे कमी खर्चात अचूक निदान आणि प्रभावी उपचार व्यवस्थापन शक्य होणार आहे.लर्जीची लक्षणांकडे बऱ्याचदा दुर्लक्ष केले जाते किंवा त्यावर चुकीच्या पद्धतीने उपचार केले जातात ज्यामुळे रुग्णांना दीर्घकाळ त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेले हे क्लिनिक अन्न, पर्यावरण आणि जीवनशैलीशी संबंधित विविध प्रकारच्या लर्जींचे अचूक निदान करण्यास मदत करणार आहे. यामुळे रुग्णांना त्यांच्या लर्जीचे मूळ कारण (ट्रिगर्स) समजेल आणि उपचार योजना आखता येतील.या क्लिनिकचे उद्घाटन प्रसंगी डॉ. अमिश वाखलू (ईएनटी आणि हेड ॲण्ड नेक सर्जन),




डॉ. चंद्रशेखर टी. (क्रिटिकल केअर मेडिसिन), डॉ. निशांत तावडे (इंटरनल मेडिसिन) आणि डॉ. मनीष पेंडसे (फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सुनील कुट्टी (संस्थापक संचालक - ब्रेन आणि स्पाइन सर्जरी) आणि डॉ. माताप्रसाद गुप्ता (उपाध्यक्ष आणि सीईओ) यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. अमिश वाखलू (ईएनटी आणि हेड ण्ड नेक सर्जन) सांगतात की, अनेकदा लर्जीकडे दुर्लक्ष केले जाते, त्यामुळे वारंवार लक्षणं जाणवू लागतात आणि अस्वस्थता निर्माण होते. या क्लिनिकमुळे अन्न, श्वसनमार्गासंबंधी लर्जी (जसे की धूळ, परागकण आणि पाळीव प्राण्यांचे केस) आणि त्वचेशी संबंधित लर्जींचे अचूक निदान करता येणार आहे. एकाच पॅनेलमध्ये विविध तपासण्या उपलब्ध असल्याने वेळ वाचेल आणि अचूक उपचार घेणे शक्य होईल.न्यूईरा हॉस्पिटलचा हा उपक्रम प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेकडे टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात असून, लर्जीच्या वाढत्या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी तो उपयुक्त ठरणार आहे.

# ठाण्यातील कल्पतरू पार्कसिटीची १०:९० योजना गुंतवणूकदारांसाठी ठरतेय 'गेमचेंजर'

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

शहरातील रिअल इस्टेट बाजारात पुन्हा एकदा गुंतवणुकीची चैतन्यदायी लाट दिसू लागली असून, या वाढत्या आकर्षणामागे महत्त्वाचा घटक ठरतोय कल्पतरू पार्क सिटी या प्रकल्पाची १०:९० पेमेंट योजना. कमी गुंतवणुकीत मोठा फायदा मिळवून देणारी ही योजना गुंतवणूकदारांसाठी 'सुवर्णसंधी' मानली जात आहे. या योजनेनुसार खरेदीदारांना सुरुवातीला केवळ १० टक्के रक्कम भरावी लागते, तर उर्वरित ९० टक्के रक्कम ताबा मिळाल्यानंतर द्यायची आहे. त्यामुळे ईएमआयचा ताण त्वरित येत नाही आणि गुंतवणूक अधिक सुलभ व नियोजनबद्ध होते.कोलशेत रोडवरील सुमारे १०० एकरांवर उभारलेला हा भव्य टाउनशिप प्रकल्प ठाण्यातील सर्वात मोठ्या निवासी प्रकल्पांपैकी एक मानला जातो. २, ३ आणि ४ बीएचके घरे, २०+ एकरांचे 'नमो ग्रँड सेंट्रल



पार्क' आणि ४,५०० हून अधिक झाडे यामुळे येथे 'ग्रीन लिव्हिंग'चा अनोखा अनुभव मिळतो. प्रकल्पामध्ये ४०० हून अधिक अत्याधुनिक सुविधा, क्लब हाऊस, क्रीडा संकुल, हाय-स्ट्रीट रिटेल यांचा समावेश आहे. सहा एकरांहून अधिक खुली जागा, फुटबॉल ग्राऊंड तसेच भविष्यात आयसीएसई बोर्डाची शाळा यामुळे हा प्रकल्प परिपूर्ण जीवनशैली देणारा ठरतो.भिवंडी-नाशिक मार्ग, घोडबंदर रोड यांसारख्या प्रमुख मार्गांशी जवळीक, तसेच प्रस्तावित मुंबई व भिवंडी-कल्याण मेट्रो लाईन्समुळे या परिसराची कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होत आहे. प्रकल्पासून जवळ असलेल्या कोलशेत खाडीकिनाराहून जाणारा कोस्टल रोड, कोलशेत खाडीवरील पूल यामुळे प्रवासाची चांगली सोय उपलब्ध होणार आहे. आगामी पायाभूत सुविधांमुळे भविष्यातील मालमत्ता मूल्यवाढीसही चालना मिळण्याची शक्यता आहे. १.३ कोटींपासून सुरू होणाऱ्या किमतींसह या प्रकल्पाची विक्री वेगाने सुरू आहे. विशेष म्हणजे, १०:९० योजनेचा लाभ ३१ मार्चपर्यंत उपलब्ध असून, दर्जेदार जीवनशैली आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचा विचार करणाऱ्यांसाठी ही संधी गमावू नये, असे तज्ज्ञांचे मत आहे.

## घार हिंडे आकाशी तिचे लक्ष पिलांपाशी–महेंद्रशेठ घरत

# शेलघरमध्ये २१ बाईकच्या एमजी ट्राफीचे झोकात उदघाटन

दैनिक वादळ वाता
**उरण | प्रतिनिधी**

माझ्या जडणघडणीत माझ्या शेलघर गावाचा मोलाचा वाटा आहे. एकेकाळचे शेलघर आणि आताचे शेलघर यात जमीन आस्मानाचा फरक आहे. आज माझे शेलघर गाव महाराष्ट्राच्या नकाशात सुनियोजित, स्वच्छ आणि बंगल्यांचे गाव म्हणून उदयास आले आहे. त्यासाठी मला खूप मेहनत घ्यावी लागली आणि अनेकांच्या विरोधालाही सामोरे जावे लागले; परंतु मी हार मानली नाही. म्हणूनच आजचे शेलघर सर्व सुविधांनी दिमाखात उभे आहे. त्यामुळे शेलघरचे नाव मोठे होण्यासाठी सर्वकाही करायला मी तयार आहे. त्यामुळेच गावातील युवकांनी माझ्याकडे २१ बाईकची प्रकाशझोतातील सामन्यांची कल्पना मांडली. त्याला मी लगेच होकार दिला. कारण आपले गाव हे गावच असते, तेथील आया–बहिणींची माया, प्रेम ही आपली शिदोरी असते. त्यामुळे त्या शिदोरीला विसरून चालणार नाही. शेवटी ग्रामस्थांच्या खांद्यावरूनच शेवटचा प्रवास आपल्याला करायचा असतो, याची मला जाणीव आहे. मी जरी





आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करीत असलो तरी परदेशात असतानाही माझे गावाकडे बारीक लक्ष असते. 'घार हिंडे आकाशी तिचे लक्ष पिलांपाशी', अशी माझी अवस्था गावाबाबतीत होते. त्यामुळेच मी गावातील प्रत्येक सुख–दुःखात सहभागी होतोच. एमजी ट्राफीचे भव्य आयोजन करून तरुणांनी निश्चितच खेळाडूंना उत्तम संधी दिली आहे. त्याबद्दल सर्व तरुणांचे अभिनंदन, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत एमजी ट्राफीच्या उदघाटनप्रसंगी म्हणाले. त्यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. २७) रात्री झोकात उदघाटन झाले. यावेळी बँजो पथकाच्या तालावर आणि फटाक्यांच्या आतषबाजीत महेंद्रशेठ घरत आणि मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था आणि महेश स्पोर्टस शेलघर यांच्या वतीने शेलघरमध्ये शुक्रवारपासून एमजी ट्राफीचे आयोजन करण्यात आले आहे. २७ मार्च ते १ एप्रिलदरम्यान हे प्रकाशझोतातील टेनिस सामने होतील. सुमारे ५० संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. त्यामुळे खेळाडूंना चक्क २१ बाईक जिंकण्याची अपूर्व संधी मिळणार आहे. त्यामुळे स्पर्धेची रंगत वाढली आहे. २१ बाईकचा रणसंग्राम पाहण्यासाठी क्रिकेट रसिक मोठ्या प्रमाणात हजर होते. त्यामुळे विजेत्या संघाच्या खेळाडूंची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, ऍड.अविनाश ठाकूर, उद्योजक कुणाल घरत, गुलाबशेठ घरत, श्रीकांत घरत, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, काँग्रेसचे हेमराज म्हात्रे, निखिल ढवळे, देविदास म्हात्रे आणि एमजी ग्रुपचे सहकारी उपस्थित होते.

# राम टेकाळे याची नागपूर ग्रामीण पोलिस मध्ये निवड




दैनिक वादळ वाता
**पाचोड | प्रतिनिधी**

भगवान बाबा माध्यमिक विद्यालय केकत जळगावचा माजी विद्यार्थी राम परमेश्वर टेकाळे याची नागपूर ग्रामीण पोलिस पदावर निवड झाली. एसईबीसी प्रवर्गातील टॉपर असल्याने त्यांची निवड निश्चित मानली जाते. राम टेकाळे यांच्या तीन वर्षाचा अथक प्रयत्नातून त्याला हे यश प्राप्त झाले .खडतर मेहनत, चिकाटी, आणि सातत्य यामुळे त्याला हे यश मिळाले आहे. त्याबद्दल परीसरात राम चे कौतुक होत आहे

राम टेकाळे च्या निवडीबद्दल खासदार श्री संदिपान पाटील भुमरे साहेब, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजुनाना पाटील भुमरे, आमदार श्री विलास बापू भुमरे साहेब आणि नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य शिवराज भैय्या भुमरे पाटील.प्रगतशिल शेतकरी श्री ज्ञानदेव वने , मुख्याध्यापक संतोष सव्वाशे, रघुनाथ जाधव सर बाळासाहेब बोबडे सर, कल्याण सोनवणे सर, विष्णू टोपे सर, थोरे सर, राठोड, शेळके यांनी अभिनंदन केले आहे.

## चांदूर बाजार तालुक्यात विकासकामांमध्ये भ्रष्टाचाराचे आरोप; चौकशीची मागणी

दैनिक वादळ वाता
**अमरावती | प्रतिनिधी**

चांदूर बाजार तालुक्यात सुरू असलेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे गंभीर आरोप समोर येत आहेत. स्थानिक नागरिक, पत्रकार तसेच समाजसेवकांनी या संदर्भात प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या असूनही संबंधित यंत्रणेकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे.

तालुक्यातील रस्ते, बांधकामे आणि इतर विकासकामांमध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याची तसेच कामे अपूर्ण ठेवून निधीचा अपव्यय झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. काही ठिकाणी कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून प्रत्यक्षात ती अपूर्ण असल्याचेही निदर्शनास आले आहे.या सर्व प्रकारांकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, त्यामुळे शासनाच्या विकास योजनांबाबत जनतेचा विश्वास कमी होत असल्याचे चित्र आहे.

पत्रकार आणि समाजसेवकांनी याप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून पारदर्शकता राखावी, अशीही मागणी होत आहे.

दरम्यान, या आरोपांमुळे तालुक्यात खळबळ उडाली असून प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' वडीगोद्री मंडळात यशस्वीरित्या संपन्न



दैनिक वादळ वाता
**वडीगोद्री | प्रतिनिधी**

तहसील कार्यालय अंबड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला आमदार हिकमत दादा उढाण यांनी उपस्थित राहून विविध विभागांच्या स्टॉलना भेट देत नागरिकांशी संवाद साधला व शिबिरातील सेवांची माहिती घेतली. यावेळी आमदार हिकमत दादा उढाण यांच्या हस्ते अनेक लाभार्थी शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, हार्वेस्टर तसेच विविध शासकीय प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

शिबिरामध्ये महसूल, ग्रामविकास, कृषी, आरोग्य आदी विविध विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. ११ पेक्षा जास्त प्रकारच्या सेवा व योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

तसेच जात, उत्पन्न, निवासी दाखले, नॉन–क्रीमिलियर प्रमाणपत्र यांसह विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन व अर्ज स्वीकृतीची सुविधा देण्यात आली. यामुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला.

यावेळी उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी व तहसीलदार विजय चव्हाण यांच्यासह इतर अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात लाभार्थ्यांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला

# संघटनेचे जनसंपर्क कार्यालय ठरतेय नागरिकांसाठी आधारस्तंभ

## ॲड.वामनराव चटप नागरी सुविधा केंद्राचे मोलाचे योगदान

दैनिक वादळ वाता
**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राजुरा येथील नागरिकांच्या विविध समस्या, प्रशासकीय तक्रारी तसेच वेकोलीशी संबंधित प्रलंबित प्रश्नांना प्रभावी तोडगा काढण्यासाठी शेतकरी संघटनेतर्फे सुरू करण्यात आलेले जनसंपर्क कार्यालय नागरिकांसाठी दिलासा ठरत आहे.या उपक्रमाअंतर्गत ॲड. दीपक चटप यांच्या कायदेशीर सल्ला व मार्गदर्शनाखाली वेकोली व्यवस्थापनाशी संबंधित कामगार, विस्थापित तसेच स्थानिक नागरिकांच्या अडचणी सोडवण्याची प्रक्रिया अधिक गतीमान करण्यात आली आहे. यामुळे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होत आहे.तसेच सामाजिक, शैक्षणिक



आणि वैयक्तिक तक्रारींसह विविध कायदेशीर विषयांवर नागरिकांना योग्य सल्ला, मदत व मार्गदर्शन दिले जात आहे. तक्रारींची नोंदणी, संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय, कायदेशीर मांडणी आणि प्रकरणांचे निराकरण ही सर्व कामे सुटसुटीत व पारदर्शक पद्धतीने केली जात आहेत.

शेतकरी संघटनेचे हे जनसंपर्क कार्यालय नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या समस्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत सुरू असलेला हा उपक्रम भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानसही व्यक्त करण्यात आला.

# उमा राजन काळे (खांडेकर) : सुसंस्कृत सामाजिक क्षेत्रातील नवी दिशा

दैनिक वादळ वाता
**सोलापूर | प्रतिनिधी**

सामाजिक कार्य, सेवा आणि सुसंस्कृतता यांचा सुंदर संगम म्हणजे राज्यस्तरीय आदर्श समाजरत्न पुरस्कार प्राप्त उमा राजन काळे (खांडेकर). उच्च शिक्षित उमा काळे यांनी सामाजिक क्षेत्राच्या माध्यमातून सोलापूर शहरामध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याची दिशा आणि विचारांची भूमिका आजच्या गोंधळलेल्या सामाजिक क्षेत्रात सुसंस्कृततेचा नवा श्वास देणारी ठरते. उमा राजन काळे (खांडेकर) यांना सेवा, भाव आणि शिस्तीचा आदर्श आहे. सामाजिक कार्यातून मिळालेली शिस्त, बांधिलकी आणि प्रामाणिकपणा यांचे संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्वात ठळकपणे दिसून येतात.



अनेक दिवसांपासून उमा काळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मेकॅनिकल विभागामध्ये कार्यरत आहेत. सोलापूर शहरामधील विविध सामाजिक तसेच शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सहभाग असतो. समाजातील दुर्बल घटक, विद्यार्थी तसेच महिलावर्ग आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नावर त्यांनी सातत्याने काम केले आहे. अनेक उपक्रमांना त्यांनी आर्थिक मदतही केली आहे. सामाजिक विभागासाठी कार्य करण्याची त्यांची वृत्ती निःस्वार्थ नेतृत्वाचे उदाहरण आहे आणि याच कार्याची दखल म्हणून त्यांना अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. उमा राजन काळे यांचा मितभाषी स्वभाव आणि सौजन्यपूर्ण वर्तन या गुणांमुळे त्या सुसंस्कृत समाजकार्याच्या प्रतिक ठरल्या आहेत. संयम, संस्कार आणि संवाद यांना तेवढेच महत्त्व असते, हे त्या आपल्या कृतीतून दाखवतात. त्यांच्या नेतृत्व शैलीत वाद नाही, विचार आहे. स्पर्धा नाही, सेवा आहे.

सामाजिक कार्य, सेवाभाव आणि सुसंस्कृत दृष्टिकोन या तीन आधारांवर उभे असलेले त्यांचे व्यक्तिमत्व अनेकांसाठी आदर्शवत बनले आहे. सामाजिक क्षेत्राला वैचारिकता, सौजन्य आणि विधायकतेचा स्पर्श देणार्या उमा काळे या निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी आहेत.

# चिमूर विधानसभा मतदारसंघाच्या युवक अध्यक्ष पदी प्रशांत डवले यांची नियुक्ती

## राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या बळकटीसाठी देणार योगदान

दैनिक वादळ वाता
**पळसगांव(पि) | प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शंतनु धोटे यांनी,प्रशांत डवले यांची राष्ट्रीय काँग्रेस पक्षातंर्गत चिमूर विधानसभा मतदारसंघाचे युवक अध्यक्ष म्हणून दिनांक : २७/०३/२०२६ रोज शनिवारला नियुक्ती केली आहे.

नियुक्ती पत्रात म्हटले आहे की,भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खरगे यांना अभिप्रेत असलेली पक्ष संघटना बांधणी मजबूत करण्याच्या दृष्टीने,काँग्रेस विधिमंडळ पक्षनेता माजी विरोधी पक्ष नेते व आमदार विजय वडेट्टीवार यांच्या मान्यतेने आणि पक्ष श्रेष्ठींच्या संमतीने,चंद्रपूर



जिल्हा (ग्रामीण) युवक काँग्रेस कमिटी तर्फे जिल्हाध्यक्ष शंतनू धोटे,आपली चिमूर विधानसभा युवक काँग्रेसच्या अध्यक्ष पदी नियुक्ती करीत आहे.

आपल्याला जाणीव आहे की,अखिल भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रभारी मनीष शर्माजी,भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानुजी,महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रभारी अजय चीकारा जी,महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष शिवराज मोरे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते,हे विद्यमान भाजप सरकारच्या जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या धोरणांवर तसेच सर्वसामान्य जनतेला भेडसावणाऱ्या महागाई आणि भ्रष्टाचार यासारख्या गंभीर विषयावर जागरुकता निर्माण करण्यासाठी दिवसरात्र झटत आहेत.

धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक विकास देणारे कांग्रेस सरकार राज्यात व देशात आणण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत तसेच आपन सुद्धा पक्षाचे ध्येय धोरणे व कार्यक्रम राबवीतांना समाजातील प्रत्येक घटकात न्याय देऊन पक्ष मजबूत करण्यासाठी आपण प्रामाणीक प्रयत्न कराल ही आपणास आशा बाळगतो.

प्रशांत डवले यांना नवीन जबाबदारी बाबत चंद्रपूर जिल्हाध्यक्ष ग्रामीण युवक शंतनु धोटे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालिस खूप खूप शुभेच्छा दिल्यात..

शंतनु धोटे यांनी प्रशांत डवले यांच्या नियुक्तीचे पत्र माहिती करीता,विजय वडेट्टीवार,आमदार ब्रम्हपुरी विधानसभा,सुभाष धोटे जिल्हाध्यक्ष,चंद्रपूर जिल्हा कॉंग्रेस कमिटी,नवजोत सिंह सिद्धू,प्रभारी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस,शिवराज मोरे प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस,अनुराग भोयर,प्रभारी चंद्रपूर जिल्हा (ग्रामीण) युवक काँग्रेस यांना पाठविले आहे.

# यशोधरा बुद्ध विहारात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना; विविध कार्यक्रमांचे आयोजन

## काल.राधाबाई वाघमारे यांची संकल्पपूर्ती व काल.भिकाजीराव वाघमारे यांच्या पावन स्मरणार्थ भिम प्रतीरुपाच दान

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील फुले नगर भागातील यशोधरा बुद्ध विहार येथे शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य मूर्तीचा प्रतिष्ठापना सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न होणार आहे. हा सोहळा कालकथित राधाबाई भिकाजीराव वाघमारे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आणि कालकथित भिकाजीराव किसन वाघमारे (माजी जि.प. सदस्य, बीड) यांच्या पावन स्मरणातून आयोजित करण्यात आला आहे.

**दिवसभर भरगच्च कार्यक्रम आयोजन**

मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त दिवसभरात तीन सत्रांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रथम सत्र (सकाळी ९:३० वा.): पूजनीय भिक्खू संघाच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येईल.

द्वितीय सत्र (सकाळी १०:३० वा.): डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येईल. ही मिरवणूक यशोधरा बुद्ध विहार (फुले नगर) पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा विहार येथे येईल.

तृतीय सत्र (दुपारी १२:०० वा.): पूजनीय भिक्खू संघ आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची रीतसर प्रतिष्ठापना केली जाईल.

**प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शन**

या सोहळ्याला पु.भदंत धम्मशील थेरो (शिवणी), पु.भदंत पिंडोल (फुले पिंपळगाव) आणि पु.भदंत संघप्रिया थेरो (छत्रपती संभाजीनगर) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मदेसना संपन्न होईल.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.बाबुरावजी पोटभरे (संस्थापक, बहुजन विकास मोर्चा) भूषवणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून मा.आ.प्रकाशदादा सोळंके (आमदार, माजलगाव विधानसभा) तर प्रमुख उपस्थिती मध्ये शिफा बिलाल चाऊस नवनिर्वाचित नगराध्यक्षा माजलगाव, राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक माजलगाव, दयानंद भाऊ स्वामी, सहालभैय्या चाऊस, डॉ.मिलिंद आव्हाड, श्रीहरी नाना मोरे, विजय दादा साळवे, कचरू तात्या खळगे, डॉ.प्रकाश आनंदगावकर, डॉ.श्रीराम खळगे, प्रकाश बन्सी कांबळे, अविनाश तात्या जावळे, नवनाथ




धाईजे, धम्मानंद साळवे, भीमराव आप्पा टाकणखार, डॉ.अशोकराव तिडके, ड.नरहरी कांबळे, अभिजीत भैय्या पोटभरे, सदानंद भैया प्रधान, अशोक लांडगे सर, सचिन जावळे, विजय शिंदे, राज अहमद सय्यद नूर, प्रशांत शेटे, मेहमूद कुरेशी, जुनेद खान पठाण, सचिन डोंगरे, अंकुशराव जाधव, राजेश घोडे, राजेश साळवे, अविनाश बनसोडे, राकेश साळवे, भास्करराव घाडगे, महेंद्र टाकणखार, ड.रवींद्र टाकणखार, राहुलकुमार टाकणखार सर, ड.सुजीत कांबळे, सदाशिव भालेराव, के.व्ही साळवे, धम्मचारी अमोलरत्न, डॉ.भागवत साळवे आदी मान्यवर उपस्थित तसेच माजलगाव शहरासह जिल्ह्यातील विविध राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.कालवश, भिकाजीराव वाघमारे यांच्या परिवारातील विद्याताई साहेबराव निसर्गंध, रोहिणी निवृत्ती भाले, सुनिता भिमराव टाकणखार, शालिनी अर्जुन गणकवार, सीमा ओमप्रकाश टाकणखार, योगिता कपिल गणकवार, प्रतिभा वसंत पंडित, अनंत नामदेव वाघमारे व यशोधरा बुद्ध विहार ट्रस्टच्या वतीने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. ट्रस्टचे अध्यक्ष प्रा.आर.एम. कांबळे, उपाध्यक्ष सुशिलाताई चांदमारे, सचिव बाबासाहेब जाधव सर व सर्व सदस्य या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.सधम्म सेवा संघ, भारतीय बौद्ध महासभा आणि त्रिरत्न बौद्ध महासंघ या धार्मिक संघटनांचे विशेष सहकार्य या सोहळ्याला लाभले आहे. आयोजकांनी सर्व उपासक-उपासिकांना पांढरे वस्त्र परिधान करून या मंगलप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# सीए पृथ्वीराज घुंबार्डे यांची यशस्वी वाटचाल

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील युवा उद्योजक व अभ्यासू वृत्तीचे पृथ्वीराज मधुकर घुंबार्डे यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) ही प्रतिष्ठेची पदवी संपादन करत यशाची नवी शिखरे गाठली आहेत. त्यांच्या 'केपीसीए अँड कंपनी' या कार्यालयाचा गेवराई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, व्यावसायिक, मित्रपरिवार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी घुंबार्डे यांच्या मेहनतीचे व चिकाटीचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. 'केपीसीए अँड कंपनी'च्या माध्यमातून कर सल्ला, लेखापरीक्षण, उद्योग मार्गदर्शन व आर्थिक नियोजन यांसारख्या सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असल्याने व्यापारी, उद्योजक व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा



पृथ्वीराज मधुकर घुंबार्डे यांच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देताना ड. सुरेशराव हात्ते, पत्रकार सुभाष मुळे व सहकारी..

मिळणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील तरुणांना व्यवसाय व आर्थिक साक्षरतेसाठी मार्गदर्शन मिळणार असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. यावेळी बोलताना पृथ्वीराज घुंबार्डे म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आर्थिक सेवा स्थानिक पातळीवर मिळाव्यात, हा आमचा उद्देश आहे. पारदर्शकता आणि विश्वास या तत्वांवर आधारित सेवा देण्याचा प्रयत्न राहील.उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनीही युवकांनी शिक्षणासोबत व्यवसायिक कौशल्य आत्मसात करून समाजासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन केले. या उपक्रमामुळे गेवराईसह परिसरातील आर्थिक व्यवहारांना चालना मिळणार असून युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. आलेल्या प्रत्येक अतिथींचे आदरातिथ्य 'घुंबार्डे समुहाच्या' वतीने करण्यात आले.

# एलपीजीचा फुगा फुटला! तळोदा तालुक्यात पुन्हा 'बायोगॅस' च्या आठवणींना उजाळा; जुनं ते सोनं म्हणण्याची वेळ

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

९० च्या दशकात तळोदा तालुक्यातील पूर्व ग्रामीण भागात सदन शेतकऱ्यांच्या अंगणात डौलाने उभे असलेले बायोगॅस प्रकल्प आज काळाच्या पडद्याआड गेले असले, तरी आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे निर्माण झालेल्या एलपीजी तुटवड्याने पुन्हा एकदा या जुन्या तंत्रज्ञानाची प्रकर्षाने आठवण करून दिली आहे. नव्याच्या नऊ दिवसात जुन्या शाश्वत ऊर्जेला विसरणाऱ्यांवर आता पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे.काही दशकांपूर्वी ग्रामीण भागात गुरांची संख्या मोठी होती. शेतीकामासाठी बैलांची जोडी आणि जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायामुळे गाई-म्हशींनी गोठे भरलेले असायचे. या गोधनाचा सांभाळ करण्यासाठी 'सालगडी' ही पद्धत अस्तित्वात होती. वर्षभराचे धान्य आणि ठराविक रक्कम घेऊन राबणारा हा सालगडी केवळ गुरांचा चारा-पाणीच नाही, तर बायोगॅस प्रकल्पाचीही देखभाल करायचा. विहित टाक्यांमध्ये शेण आणि पाण्याचे योग्य मिश्रण करून त्यातून निर्माण होणारा गॅस



घरातील स्वयंपाकासाठी वापरला जायचा. ही खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण आणि स्वच्छ ऊर्जेची संकल्पना होती.

काळाच्या ओघात शासनाकडून एलपीजी गॅसचा पुरवठा सुरू झाला. स्वच्छ इंधन घराघरात पोहोचवण्याच्या उद्देशाने गॅस एजन्सींचे जाळे विस्तारले. गेल्या काही वर्षांत 'उज्वला योजने'मुळे तर अगदी दुर्गम भागातही गॅस सिलिंडर पोहोचले. याचा परिणाम असा झाला की, कष्टप्रद वाटणाऱ्या बायोगॅस प्रकल्पांकडे शेतकऱ्यांनी दुर्लक्ष केले. ट्रॅक्टरच्या वापरामुळे बैलांची संख्या घटली, गाई-म्हशिंची ही संख्या घटली त्याचबरोबर मजुरांच्या टंचाईमुळे बायोगॅससाठी लागणारे शेण उपलब्ध करणे कठीण झाले. परिणामी, अनेक सदन शेतकऱ्यांनी आपले बायोगॅस प्रकल्प कायमचे बंद केले.इराण, इस्राईल,अमेरिका यांच्यातील तणावामुळे जागतिक स्तरावर एलपीजीचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. भारतासारख्या आयातदार देशात याचे पडसाद उमटत असून तळोदा तालुक्यातील ग्रामीण भागात सिलिंडरचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे. महिना-दोन महिने वाट पाहूनही सिलिंडर मिळत नसल्याने गृहिणींना पुन्हा लाकूड फाटा गोळा करून चुली पेटवाव्या लागत आहेत.आजच्या यांत्रिक युगात ज्यांनी आपले बायोगॅस प्रकल्प मोडीत काढले, त्यांच्यावर आता पश्चात्तापाची वेळ आली आहे. शाश्वत आणि घरच्या घरी उपलब्ध होणाऱ्या ऊर्जेचा त्याग करून केवळ बाह्य पुरवठ्यावर अवलंबून राहणे कसे अंगलट येऊ शकते, याचा प्रत्यय सध्या ग्रामीण जनतेला येत आहे. जुन्याला तात्पुरते विसरावे, मात्र नव्याला अंगलट येऊ देऊ नये, ही म्हण आजच्या या परिस्थितीला तंतोतंत लागू पडत आहे.

# स्टोन क्रेशरला वीज पुरवठा करण्यासाठी दादागिरीने आदिवासी शेतकऱ्यांची संमती न घेता शेतात उभे केले विजेचे बाराखंबे

दैनिक वादळ वार्ता
**मांडवी । प्रतिनिधी**

मौजे शिरपूर शिवारात होऊ घातलेल्या स्टोन क्रेशरसाठी आदिवासी शेतकऱ्यांची संमती न घेता मनमानीपणे बारा खंबे उभे करणाऱ्या वर कडक कारवाई करण्याचे निवेदन आदिवासी शेतकऱ्यांनी मांडवी पोलीस स्टेशनला व वीज केंद्राला दिली.मांडवी येथील शेतकऱ्यांची शेती शिरपूर शिवारात आहे.या शेती लगत स्टोन क्रेशर टाकण्याच्या हालचाली सुरू आहे. त्यासाठी वीज पुरवाठ्याकरिता विजेचे खांब टाकल्या गेले.हे काम त्यांनी चोरासारखे मशनरीने एकाच रात्रीतून केले. यासाठी त्यांनी या आदिवासी बांधवांची संमती किंवा परवानगी घेणे गरजेचे असतांना कोण काय करून घेणार या अविर्भावात हे काम केल्या गेले आहे.शिरपूर ग्रामपंचायत अंतर्गत असल्याने या स्टोन क्रेशर साठी किंवा वीज पुरवठ्यासाठी ग्रामपंचायत शिरपूर ची परवानगी किंवा ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असताना ते सुद्धा घेण्यात आलेले नाही.वीज पुरवठ्यासाठी वीज वितरण कडे वीज पुरवठा बाबत कुठलाही प्रस्ताव नाही, सर्वे झालेला नाही, कोटेशन दिले गेले नसताना नियमबाह्य वीज खांब उभे करण्याच्या व तारा ओढण्याचे काम केल्या गेले शेतात खांब उभे झालेले पाहून आदिवासी संतप्त झाले सदर काम थांबविण्यासाठी काल दि. २७ मार्च २६ रोजी मांडवी पोलीस स्टेशनमध्ये त्यांनी संबंधितावर कारवाई करण्याची मागणी केली पण अदयाप कुणावर कारवाई झालेली नाही..जल, जंगल, जमिनीवर आदिवासींचा अधिकार असताना आदिवासीच्या मालकीचे शेत ताब्यात घेऊन मनमानीपणे वीज खांब उभे करणे म्हणजे आदिवासी कायदा व पेसा कायद्याचे सरळ उल्लंघन करणे होय.शेती हे त्यांचे उपजीविकेचे साधन आहे या व्यतिरिक्त त्यांना दुसरे कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही. या स्टोन क्रेशरमुळे रोज निर्माण होणाऱ्या धुळीमुळे त्यांची शेती पिकायोग्य राहणार नाही. याचा परिणाम आरोग्यावर सुद्धा होणार आहे नेहमी होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे जवळच असलेल्या लिंगीत तांड्यातील घरांना तडे जाणार आहेत .स्टोन क्रेशर साठी निवडलेले जागे कडे जाण्यासाठी या आदिवासीच्या शेतातून पायवाट किंवा बैलगाडी रस्ता असताना मोठे हायवा आणि टिप्पर जात येत असल्याने रस्ता मोठा होऊन नुकसान होत आहे.आदिवासींनी दिलेल्या तक्रारीवरून आज कनिष्ठ अभियंता देशमुखे यांनी येऊन खांबांची पाहणी केली व या नियमबाह्य खांबांना उद्या पर्यंत काढून मांडवीच्या वीज कार्यालयात जमा करण्यार असल्याचे सांगितले.आहे...

# हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत कंधार बसस्थानकाचे चौथे सर्वेक्षण संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**कंधार । प्रतिनिधी**

हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत कंधार येथील बसस्थानकाचे चौथे सर्वेक्षण नुकतेच पार पडले. या सर्वेक्षणासाठी राज्य परिवहन धाराशिव विभागाचे विभाग नियंत्रक अजय पाटील हे मूल्यांकन समितीचे प्रमुख म्हणून उपस्थित होते.

यावेळी कामगार अधिकारी प्रदीप सुतार, पत्रकार मुरलीधर तोटे तसेच प्रवासी मित्र बालाजी गुंडाळे यांनी बसस्थानकाच्या स्वच्छता, सुविधा व व्यवस्थापनाची पाहणी करून विविध बाबींचे मूल्यांकन केले. बसस्थानक परिसरातील स्वच्छता, प्रवाशांसाठी उपलब्ध सुविधा, तसेच कर्मचाऱ्यांची कार्यपद्धती यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

याप्रसंगी कंधार बसस्थानकाचे स्थानक



प्रमुख अनिल पळनाटे, ईश्वर गोरे, आर. व्ही. कदम, एम. के. मुस्तापूरे, जी. डी. पांचाळ, पी. जी. काळे, शिवराज बोधगिरे, शिवाजी तोटवाड, भगवान चव्हाण, व्ही. बी. अभंगे, आर. बी. कल्याणकस्तुरे, डी. व्ही. मंगनाळे, डी. एम. कंधारे, बी. जी. मैस्सना, एन. डी. ठाकूर, एन. व्ही. सूर्यवंशी, एम. डी. केंद्रे, रमेश आडकुटे, नामदेव धोंडगे, एफ. एन. शेख, जी. डी. शिंदे, ए. डी. केंद्रे, ए. बी. गित्ते आदी कर्मचारी उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने प्रवाशांचीही उपस्थिती होती.

या सर्वेक्षणातून कंधार बसस्थानकाच्या स्वच्छता व सेवा सुधारण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले असून, भविष्यात अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# सुप्रसिध्द साहित्यिक विलास सिंदगीकर यांच्या 'भाकरीचं झाड' या कथेने पुणेरी प्रेक्षकांच्या डोळयाच्या कडा पाणावल्या

दैनिक वादळ वार्ता
**जळकोट । प्रतिनिधी**

मराठी कथा साहित्य निर्मितीला संपन्न वारसा आणि परंपरा आहे . मानवाला कथा साहित्याची देण ही प्राचीन काळापासून लाभली आहे . कथा हा वाङमय प्रकार हा माणसाच्या आवडीचा प्रांत आहे . माणूस हा गोष्टी वेल्हाळ प्राणी आहे . या कथाकथन परंपरेला ७०-८० वर्षाचा इतिहास आहे . आद्यकवी मुकुंदराज यांच्या पासून सुरू झालेला हा वारसा अण्णाभाऊ साठे, अरविंद गोखले, दि.बा. मोकाशी, आणि गंगाधर गाडगीळ यांनी १९६० च्या दशकात कथेला नवा साज दिला . या सर्वांची कथा वाचायची होती, तर व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील, आणि द .मा . मिरासदार यांची कथा ही कथाकथन परंपरा पुढे नेहणारी होती ' , असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक विलास




सिंदगीकर यांनी केले .

साहित्यिक कलावंत प्रतिष्ठान, पुणे आयोजित कोथरूड पुणे येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात शनिवार दि .२८ मार्च २०२६ रोजी २५ वे साहित्यिक कलावंत संमेलनातील कथाकथन सत्राच्या अध्यक्ष पदावरून बोलत होते . यावेळी प्रा .रविंद्र कोकरे आणि सु .ल.खुटवड आदी कथाकार उपस्थित होते . विलास सिंदगीकरांनी अध्यक्षीय समारोप करताना त्यांनी ' भाकरीचं झाड ' हया नावाचा गंभीर मराठवाडा बोलीची कथासांगून प्रेक्षकांच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या . त्यांनी श्रोतांना मंत्रमुग्ध करून सोडले . रविंद्र कोकरे यांनी 'पंचनामा' तर सु .ल . खुटवड यांनी विनोदी कथा सांगितल्या. तत्पूर्वी प्रतिष्ठानचे कार्यवाह मा. श्री.वि.दा.पिंगळे यांनी स्मृतीचिन्ह,पुष्पगुच्छ आणि अध्यक्षीय भाषण ग्रंथ देऊन कथाकारांचा सत्कार केला. या कथाकथन सत्राचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन सतिष सुरवसे यांनी तर आभार मुख्याध्यापक श्री .शिंदे यांनी मानले .

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077